

सांकवाळ : बिटस् पिलानीच्या निर्माण संस्थेतर्फे आयोजित केलेल्या 'उडान २०१९' क्रीडा महोत्सवात सहभागी झालेली मुले.

# बिटस् पिलानीच्या निर्माण संस्थेतर्फे 'उडान २०१९' क्रीडा महोत्सव

**प्रतिनिधी, वास्को**

सांकवाळ येथील बिटस् पिलानीच्या विद्यार्थ्यांनी स्थापन केलेल्या निर्माण या संस्थेतर्फे आयोजित केलेल्या 'उडान २०१९' क्रीडा महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. गोव्यातील विशेष मुलांसाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाला अनेक शाळांतील विद्यार्थी सहभागी झाले होते.

'उडान २०१९' क्रीडा महोत्सवाला स्पेशल ऑलिम्पिक असोसिएशन, भारत व पॅरालिम्पिक असोसिशएन ऑन गोवा यांचे सहकार्य लाभले. या क्रीडा महोत्सवात सुमारे दीडशे विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

महोत्सवाच्या बक्षीस वितरण सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून बिटस् पिलानी, गोवा कॅम्पसचे संचालक प्रा. जी. रघुरामा उपस्थित होते. त्यांच्याहस्ते यावेळी विजेत्या स्पर्धकांना पदके व प्रशस्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

या महोत्सवातील सकाळच्या सत्रात शिंध्रे आणि त्यांच्या संघाच्या मार्गदर्शनाखाली विविध गटातील सहभागी विद्यार्थ्यांनी ज्युडो खेळाची प्रात्यक्षिके सादर केली. दुपारच्या सत्रात मनोरंजनात्म खेळ, नृत्य तसेच फुटबॉल, सॉफ्टबॉल व ॲथलेटिक्स क्रीडा प्रकार सादर केले. स्पर्धेनंतर निर्माण संस्थेच्या स्वयंसेवकांनी विद्यार्थ्यांसमवेत खेळात सहभागी होऊन आनंद घेतला.

Scanned by CamScanner